# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०२/ २०२२** **दिनांक २४.०२.२०२२**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- सकाळी ११.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा गुरुवार दि.२४.०२.२०२२ रोजी शिर्डी येथील संस्थानचे साईनिवास अतिथीगृहामध्ये सकाळी ११.०० वाजता आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/४०७८/२०२२, दि.१६.०२.२०२२ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते. त्यानुसार गुरुवार दि.२४.०२.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.ना.श्री.आशुतोष अशोकराव काळे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

**या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.**

**१. मा.ना.श्री. आशुतोष अशोकराव काळे. अध्यक्ष** **२. मा.ॲड. जगदीश हरिश्चंद्र सावंत, उपाध्यक्ष**
**३. मा.ॲड. सुहास जनार्दन आहेर, सदस्य** **४. मा.श्री. अविनाश अप्पासाहेब दंडवते, सदस्य**
**५. मा.श्री. सचिन रंगराव गुजर, सदस्य** **६. मा.श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे, सदस्य**
**७. मा.श्री. जयवंतराव पुंडलिकराव जाधव, सदस्य** **८. मा.श्री. महेंद्र गणपतराव शेळके, सदस्य**
**९. मा.डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर, सदस्य**

**मा.श्रीमती भाग्यश्री बानायत, भा.प्र.से.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत समिती सदस्य मा.श्रीमती अनुराधा गोविंदराव आदिक, यांनी लेखी तसेच मा.श्री.रराहूल नारायण कनाल यांनी दुरध्वनीव्दारे कळविले होते. याची समितीने नोंद घेऊन, त्यांना अनुपस्थित राहण्याची अनुमती दिली.

भारतरत्न गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांचे दि.०६.०२.२०२२ रोजी दु:खद निधन झाले, मा.व्यवस्थापन समितीचे वतीने त्यांना श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

**यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.**

---

**विषय नं.०१** **दि.२४.०१.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.६८** **दिनांक २४.०१.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

**(कार्यवाही-सभाकामकाज विभाग)**

---

**विषय नं.०२** **दि.१२.०२.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.६९** **दिनांक १२.०२.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.**

१. **०३ नग 10 KVA UPS (रॅकसह) खरेदी करणेकामी ई-निविदा प्रक्रियाअंतर्गत निम्नतम दरधारक M/s S V Electronics, Nashik यांचेबरोबर चर्चा-वाटाघाटी करुन, वाटाघाटी अंती देऊ केलेल्या निम्नतम दराप्रमाणे त्यांना पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक M/s S V Electronics, Nashik यांचे प्रतिनिधी श्री.शरद मालकर हे आजचे उपसमिती सभेपुढे चर्चा/वाटाघाटी करीता उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता, त्यांनी प्रती UPS**

रु.६६,५०४/- ऐवजी रक्कम रु.६६,०००/-मात्र दर देऊ केले. तसेच बॅटरीकरीता ई-निविदेतील नमुद दर प्रति बॅटरी रु. ७२,०९६/-कमी करणेस असमर्थता दर्शविली.

सदरची खरेदी करणेकामी प्राप्त झालेले निम्नतम दर हे महाराष्ट्र शासनाचे खरेदी नियमावलीतील ३.१.२.१ या नियमाप्रमाणे अंदाजित किंमतीचे (-)२०% पेक्षा जास्त आहे. तथापी निम्नतम निविदाधारक यांनी ई-निविदेत नमुद Specification नुसार दर दिलेले असुन त्यानुसार पुरवठा करणार असल्याची लेखी हमी दिलेली आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, ०३ नग 10 KVA UPS (रॅकसह) खरेदी करणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक M/s S V Electronics, Nashik यांनी चर्चेअंती देऊ केलेले प्रती UPS रक्कम रु.६६,०००/-+कर व बॅटरी प्रति बॅटरी रक्कम रु.७२,०९६/-+ कर हे दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग)

---

२. श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्टकंट्रोलचे काम तसेच दररोज १०० वाढपी कामगार (५ कुशल+९५ अकुशल) आऊटसोर्स पध्दतीने पुरविणेकामी मागविणेत आलेल्या ई-निविदेतील प्राप्त न्यूनतम दर निश्चितीबाबत.

प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे.फोकस फॅसिलिटी अॅण्ड सिक्युरिटी सर्व्हिसेस, मुंबई हे आजचे उपसमिती सभेपुढे चर्चेसाठी उपस्थित होते. समितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोलचे काम तसेच दररोज १०० वाढपी कामगार (५ कुशल +९५ अकुशल) आऊटसोर्स पध्दतीने पुरविणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे.फोकस फॅसिलिटी अॅण्ड सिक्युरिटी सर्व्हिसेस, मुंबई यांचे निम्नतम दर प्रति महिना GST वगळून इतर सर्व करांसहीत रक्कम रु.३७,८१,१९८/-मात्र स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- श्री साई प्रसादालय)

---

३. सन २०२१-२२ या कालावधीसाठी व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग / स्वच्छता कामे आऊटसोर्स पध्दतीने निम्नतम दरधारकाकडून करुन घेणकामी निम्नतम दरधारकास उपसमिती सभेसमोर चर्चा वाटाघाटी करुन कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तुत प्रकणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक नॅशनल सिक्युरिटी सर्व्हिसेस, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.प्रशांत सावळे व श्री.दिपक लिंबकई हे आजचे उपसमिती सभेपुढे चर्चा/वाटाघाटीकरीता उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०२१-२२ या कालावधीसाठी व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक नॅशनल सिक्युरिटी सर्व्हिसेस, पुणे यांचे ई-निविदेतील निम्नतम दर GST सह वार्षिक एकूण रक्कम रु.१,५५,३०,१०७.४४ मात्र स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

तसेच पुढील वेळी यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता व पेस्ट कंन्ट्रोल सह एकत्रित विषय मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीपुढे सादर करण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- व्दारावती भक्तनिवासस्थान)

---

४. **साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या दोन्ही विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरातील पेस्ट कंट्रोल करणेकामी निम्नतम दरधारकास चर्चा वाटाघाटी करणेस व कार्यादेश देणेबाबत.**

प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक ग्लोबल पेस्ट कंन्ट्रोल, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी श्री.पवन गुट्टे हे आजचे उपसमिती सभेपुढे चर्चा/वाटाघाटी करीता उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली. तथापी वार्षिक सहा फवारणी पेक्षा जादा फवारणी करण्याची आवश्यकता भासल्यास त्यासाठी वेगळे दर न आकारता ई-निविदेतील नमुद दरामध्ये करुन देण्यास संमती दिली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या दोन्ही विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरातील पेस्ट कंट्रोल करणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक ग्लोबल पेस्ट कंन्ट्रोल, औरंगाबाद यांचे ई-निविदेतील नमुद निम्नतम दर GST वगळून एकुण रक्कम रु.४,११,२५१.८७ मात्र स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. **(कार्यवाही- साई धर्मशाळा)**

---

५. **श्री साई प्रसादालयातील चपाती व पुरीचा आटा मळणी करणेकरीता चार नविन आटा मळणी मशिन खरेदी करणेकामी प्राप्त ई-निविदेतील निम्नतम दरधारक मे.जय किसन मशिन टुल्स, मोरंबी यांचेशी दराबाबत चर्चा वाटाघाटी करुन प्राप्त दर शासन खरेदी नियमावलीनुसार तरतुदीनुसार १०% मर्यादेत आल्यास त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे.जय किसन मशिन टुल्स, मोरंबी हे आजचे उपसमिती सभेपुढे चर्चा/वाटाघाटीकरीता उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी ई-निविदेत नमुद एकुण दरावर ३% सवलत देण्याचे मान्य केले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयातील चपाती व पुरीचा आटा मळणी करणेकरीता चार नविन आटा मळणी मशिन खरेदी करणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे.जय किसन मशिन टुल्स, मोरंबी यांनी चर्चेअंती देऊ केलेले अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे.

**(कार्यवाही- मॅकेनिकल विभाग)**

---

६. **Philips (MP-20) मॉनिटरचे कन्झ्युमेबल ॲक्सेसरीज खरेदी करणेबाबत खरेदीकामी पुरवठा आदेश देणेबाबत.**

प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविधारक M/s Medilink Enterprises यांचे प्रतिनिधी श्री.अकील शेख हे आजचे उपसमिती सभेसमोर चर्चा/वाटाघाटीकरीता उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी ई-निविदेत नमुद दर रु.९,८२,७२८/- ऐवजी रक्कम रु.९,७०,०००/-मात्र दर देऊ केले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, Philips (MP-20) मॉनिटरचे कन्झ्युमेबल ॲक्सेसरीज खरेदी करणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक M/s Medilink Enterprises यांनी चर्चेअंती देऊ केलेले सर्व करांसहीत रक्कम रु. रु.९,७०,०००/-मात्र अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. **(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

७. **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०२१-२२ या वर्षाकरीता लागणारे औषधे व सर्जिकल साहित्य तसेच On Consignment Basis वरील Material चे दर निश्चीती (Rate Contract) करणेकामी मागविलेल्या फेर कोटेशन/फेर ई-निविदा तसेच फेर ई-कोटेशन्सला अनुसरुन पुरवठा आदेश जात असलेल्या पुरवठाधारकांना चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविणेबाबत.**

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**८.** **भांडार विभागाकडील मुदत संपलेले तिस-या टप्प्यातील शिल्लक २१८.१० क्विंटल शुध्द तूप अखाद्य म्हणून विक्री करणेबाबत.**

प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील उच्चतम दरधारक मे.सन फार्मर अॅग्रो इंडस्ट्रीज, पढेगाव, श्रीरामपूर हे आजचे उपसमिती सभेपुढे चर्चा/वाटाघाटी करीता उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेशी दर वाढवून देणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर वाढविण्यास असमर्थता दर्शविली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, भांडार विभागाकडील मुदत संपलेले तिस-या टप्प्यातील शिल्लक २१८.१० क्विंटल शुध्द तूप अखाद्य म्हणून विक्री करणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील उच्चतम दरधारक मे.सन फार्मर अॅग्रो इंडस्ट्रीज, पढेगाव, श्रीरामपूर यांचे ई-निविदेतील उच्चतम दर प्रती क्विंटल रक्कम रु.१५,३००.९१ मात्र स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. तसेच सदरचे तुप खाद्यतुप म्हणून विक्री करणार नाही असे त्यांचेकडून लेखी घेण्यात यावे. (कार्यवाही- भांडार विभाग)

---

**विषय नं.०३** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे कामकाज आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी सन २०२२-२३ या वर्षासाठी अपेक्षीत अंदाजे खर्च रक्कम रु.३,७०,००,०००/- यास मान्यता मिळून त्याप्रमाणे ई-निविदा प्रक्रिया राबविणेबाबत.**

**निर्णय क्र.७०** यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०२२-२३ या वर्षासाठी श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे कामकाज आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. ३,७०,००,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदर ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन ठेकेदाराची नेमणूक होईपर्यंत आवश्यकता भासल्यास सध्या कार्यरत असलेल्या ठेकेदाराकडून निविदा, कार्यादेश व करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार मंजुर दरात मुदतवाढ देऊन कामकाज करुन घेण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.०४** **श्री साईनाथ रक्तपेढी विभागाकरीता Fully Automated Immunoassay System ई-निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु.६७,०५,३५०/- चे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.७१** यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रक्तपेढी विभागाकरीता Fully Automated Immunoassay System खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अपेक्षीत रक्कम रु.६७,०५,३५०/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.०५** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/विभागाकरीता हॉस्पिटल फर्निचर व कार्यालयीन फर्निचर ई निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु.१६,४८,३४१/- चे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.७२** यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड / विभागाकरीता हॉस्पिटल फर्निचर व कार्यालयीन फर्निचर खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.१६,४८,३४१/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.०६** **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कॅथलॅब विभागाकरीता 2D Eco Machine खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.५८,५४,०३३/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.७३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कॅथलॅब विभागाकरीता 2D Eco Machine खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.५८,५४,०३३/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.०७** **श्री साईबाबा रुग्णालयातील डेंटल विभागातील ०२ नग जून्या Dental Chair परत (Buyback) करुन नविन ०२ नग Dental Chair with Operating Stool कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु.८,२५,०७८/- चे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.७४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील डेंटल विभागातील ०२ नग जून्या Dental Chair परत (Buyback) करुन नविन ०२ नग Dental Chair with Operating Stool खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.८,२५,०७८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.०८** **श्री साईनाथ रुग्णालयाकडे कार्यरत असलेल्या Oxygen Generator Plant ला पर्यायी व्यवस्था म्हणून Standby ठेवणेकामी २०० नग Jumbo Cylinders खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.२,३३,८९,८४८/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.७५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाकडे कार्यरत असलेल्या Oxygen Generator Plant ला पर्यायी व्यवस्था म्हणून Standby ठेवणेकामी १०० नग Jumbo Cylinders (५ वर्षाच्या रिफीलींगसहीत) खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच Oxygen Generator Plant व Oxygen Cylinders याबाबतचा तुलनात्मक प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर ठेवण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.०९** **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील ICCU, GICU, CRU-1 व Casualty या विभागाकरीता ICU Ventilator ई-निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु.५,४४,४६,६६३/- चे खर्चास व जुने Ventilator Machine Buyback करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.७६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील ICCU, GICU, CRU-1 व Casualty या विभागाकरीता ICU Ventilator खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.५,४४,४६,६६३/- चे खर्चास तसेच जुने Ventilator Machine Buyback करणेस मान्यता देण्यात आली. तथापी Buyback करावयाच्या Ventilator Machine ची घसारा वजा जाता दि.३१.०३.२०२१ अखेर येणारी रक्कम ही रु.५०,०००/- पेक्षा जास्त असल्यामुळे खरेदीपुर्वी शासनाची पुर्वमान्यता घेणेकामी प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.१०** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०२१-२२ या वर्षाकरीता लागणारे औषधे व सर्जिकल साहित्य तसेच On Consignment Basis वरील Material चे दर निश्चीती (Rate Contract) करणेकामी मागविलेल्या फेर कोटेशन/फेर ई-निविदा तसेच फेर ई-कोटेशन्सला अनुसरुन पुरवठा आदेश देणेबाबत.**

निर्णय क्र.७७ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०२१-२२ या वर्षाकरीता लागणारे औषधे व सर्जिकल साहित्य तसेच On Consignment Basis वरील Material चे दर निश्चीती (Rate Contract) करणेकामी मागविलेल्या फेर कोटेशन/फेर ई-निविदा तसेच फेर ई-कोटेशन्सला अनुसरुन पुरवठा आदेश देण्यास व त्याकामी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दिलेल्या आदेशानुसार गठीत करण्यात आलेल्या तज्ञ समितीने दिलेल्या अभिप्रायानुसार उपरोक्त प्रस्तावातील मुद्दा क्र.A ते L प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.११ मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१२४ मधील संस्थानचे भांडार परिसरात वेयरहाऊस पध्दतीचे गोडाऊन बांधणेसाठी आर्कीटेक्ट बिनेश सुकुमार, कोची यांनी सादर केलेले आराखडे व रु.३.०३ कोटी खर्चाचे अंदाजपत्रकाबाबत.

निर्णय क्र.७८ सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात आला.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

---

विषय नं.१२ संस्थानचे मौजे निमगाव को-हाळे येथिल गट नं.२४५/१ पै.मधील नविन साठवण तलावामध्ये गोदावरी उजवा तट कालव्यामधून पाणी घेणेकरीता जलवाहिनी टाकणे व इतर अनुषंगिक कामांकरीता सल्लागार दि निसर्ग कन्सल्टंसी, नाशिक यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,९६,२८,३७८/- मात्रचे खर्चास तसेच याकामी मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेणे व तदनंतर विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेसाठी मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.७९ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मौजे निमगाव को-हाळे येथिल गट नं.२४५/१ पै.मधील नविन साठवण तलावामध्ये गोदावरी उजवा तट कालव्यामधून पाणी घेणेकरीता जलवाहिनी टाकणे व इतर अनुषंगिक कामांकरीता सल्लागार दि निसर्ग कन्सल्टंसी, नाशिक यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,९६,२८,३७८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मान्यतेसाठी मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा, व शासनाचे मान्यतेनंतर विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, असे ठरले.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

विषय नं.१३ श्री साईनाथ रुग्णालयाचे दोन्ही इमारतींवर तिस-या मजल्याचे बांधकाम करणे कामाचे ठेकेदार आर.के.सावंत, नाशिक यांचे मुदतवाढ मागणी व सातवे व अंतिम देयक रु.९,०६,४३१/- मात्र आदा करणेस मान्यता देणेबाबत.

निर्णय क्र.८० यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाचे दोन्ही इमारतींवर तिस-या मजल्याचे बांधकाम करणे कामाचे ठेकेदार आर.के.सावंत, नाशिक यांनी निविदा शर्तीनुसार विहीत मुदतीत काम पुर्ण केले नसल्याने निविदा शर्तीनुसार त्यांचे बिलातून विलंबापोटी कपात करण्यात आलेली दंडाची रक्कम रु.२,२१,०००/- माफ न करता दि.०९.०८.२०२१ अखेर मुदतवाढ देण्यास तसेच सातवे व अंतिम देयकापोटी उर्वरीत रक्कम रु.९,०६,४३१/-मात्र त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

विषय नं.१४ मौजे निमगांव–को-हाळे येथिल गट नं.१६९ मधील वर्ग-०४ कर्मचारी निवासस्थान (सेवाधाम) इमारतीचे आतील व बाहेरील भागाचे रंगकाम करणेकामाचे ठेकेदार एस.व्ही.चंदन, मुंबई यांना तिसरे व अंतिम देयक रु.२,८६,०८८/- मात्र आदा करणेस मान्यता देणेबाबत.

निर्णय क्र.८१ यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगांव–को-हाळे येथिल गट नं.१६९ मधील वर्ग-०४ कर्मचारी निवासस्थान (सेवाधाम) इमारतीचे आतील व बाहेरील भागाचे रंगकाम करणेकामाचे ठेकेदार एस.व्ही.चंदन, मुंबई यांना तिसरे व अंतिम देयक रक्कम रु.२,८६,०८८/-मात्र आदा करणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

विषय नं.१५ शिर्डी सर्व्हे नं.१ मधील मंदिर परिसर गेट नं.०४ चे बाहेरील पश्चिम बाजूस संस्थान मालकीचे जागेवर अद्ययावत देणगी काऊंटर (कॅबीन) उभारणीकामी येणारे रक्कम रु.८,८७,०००/-मात्रचे खर्चास व याकामी कोटेशन मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.८२ यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी सर्व्हे नं.१ मधील मंदिर परिसर गेट नं.०४ चे बाहेरील पश्चिम बाजूस संस्थान मालकीचे जागेवर अद्ययावत देणगी काऊंटर (कॅबीन) उभारणीकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु.८,८७,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. देणगी काऊंटर उभारणीबाबत आर्किटेक्ट यांना सुचना देण्यात यावी. तसेच देणगी काऊंटरचे प्रात्यक्षिक व्यवस्थापन समितीपुढे सादर करण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

विषय नं.१६ आर्थिक वर्ष २०२२-२३ चे मुळ अंदाजपत्रक व आर्थिक वर्ष २०२१-२२ चे सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.८३ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे रुग्णालये विभागासह आर्थिक वर्ष २०२२-२३ चे प्रस्तावीत मुळ अंदाजपत्रक व आर्थिक वर्ष २०२१-२२ चे सुधारीत अंदाजपत्रकाचे अवलोकन करुन त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-लेखाशाखा)

---

विषय नं.१७ जिल्हाधिकारी व अध्यक्ष जिल्हा सैनिक कार्यालय अहमदनगर यांचेकडील सशस्त्र सेना ध्वजदिन निधीसाठी अर्थसहाय्य मागणीचे प्रस्तावावर निर्णय घेणेबाबत.

निर्णय क्र.८४ यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.जिल्हाधिकारी व अध्यक्ष जिल्हा सैनिक कार्यालय अहमदनगर यांनी संस्थानकडे निधी संकलनाकरीता सन-२०१९ करीता रुपये एक कोटी व सन-२०२० करीता रुपये पन्नास लाख मागणीचे दिलेले प्रस्ताव कालबाहय झाल्याने सदरचे दोन्ही प्रस्ताव फाईल करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच संस्थानकडे निधी संकलनाकरीता सन-२०२१ करीता रुपये पंच्याहत्तर लक्ष मागणीचा प्रस्ताव नामंजूर करण्यात आला. (कार्यवाही- लेखाशाखा)

---

विषय नं.१८ माहे ऑक्टोंबर-२०२१ ते डिसेंबर-२०२१ जमा खर्च तक्त्याची नोंद घेणेबाबत.

निर्णय क्र.८५ माहे ऑक्टोंबर-२०२१ ते डिसेंबर-२०२१ जमा खर्च तक्त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही- लेखाशाखा)

---

विषय नं.१९ श्री साई पालखी निवारा भक्तनिवास बी इमारतीचे खोल्यांचे खिडकीकरीता लोखंडी ग्रील तयार करुन बसविणेकामी येणा-या रक्कम रु.५,८७,७९०/- मात्रचे खर्चास तसेच या कामी दरपत्रके बोलाविणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.८६ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई पालखी निवारा भक्तनिवास बी इमारतीचे खोल्यांचे खिडकीकरीता लोखंडी ग्रील तयार करुन बसविणेकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.५,८७,७९०/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)

---

विषय नं.२० माहे एप्रिल-२०२२ ते मार्च-२०२३ या आर्थिक वर्षाकरीता मंदिर विभागासाठी आवश्यक पावडर मार्बल मुर्ती व श्रींचे व्दारकामाई धुनीकरीता गोवरी विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.८७ यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे एप्रिल-२०२२ ते मार्च-२०२३ या आर्थिक वर्षाकरीता मंदिर विभागासाठी आवश्यक पावडर मार्बल मुर्ती व श्रींचे व्दारकामाई धुनीकरीता गोवरी खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.९,००,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मंदिर विभाग)

---

विषय नं.२१ साई धर्मशाळा, साईआश्रम भक्तनिवास, श्री साई प्रसादालय व साईबाबा भक्तनिवासस्थान या इमारतीवरती LED Board तयार करुन बसविणेकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.२३,६७,५००/- इतक्या खर्चास तसेच विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.८८ यावर सविस्तर चर्चा होऊन, साई धर्मशाळा, साईआश्रम भक्तनिवास, श्री साई प्रसादालय व साईबाबा भक्तनिवासस्थान या इमारतीवरती LED Board तयार करुन बसविणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.२३,६७,५००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच संस्थानचे मुंबई कार्यालय येथेही LED Board तयार करुन बसविणेस व त्याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभाग)

---

विषय नं.२२ जुनी वाहने जाहीर लिलावाने विक्री करणे बाबत.

निर्णय क्र.८९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद अ.नं.१ ते १९ वाहनांकरीता उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपूर यांचेकडून सदर वाहने दुरुस्त करुन यापुढे उपयोगात आणणे आर्थिकदृष्टया किफायतशीर राहणार नाही असे प्रमाणपत्र घेऊन सदर वाहनांची विहीत पध्दतीने जाहीर लिलावाव्दारे विक्री करण्यास मान्यता देण्यात आली. याकामी मान्यतेसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा व शासन मान्यतेनंतर सदरची वाहने जाहीर लिलावाव्दारे विक्री करण्याची कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही-वाहन विभाग)

---

विषय नं.२३ श्री रामनवमी उत्सव–२०२२ मध्ये वीणा, पोथी, फोटो, पाद्यपुजा, रुद्राभिषेक इत्यादी कार्यक्रमांबाबत.

निर्णय क्र.९० यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रामनवमी उत्सव–२०२२ मध्ये वीणा, पोथी, फोटो, पाद्यपुजा, रुद्राभिषेक इत्यादी कार्यक्रमांकरीता खालील प्रमाणे मा.व्यवस्थापन समिती सदस्यांची नावे निश्चीत करण्यात आली.

| दिनांक | वेळ | कार्यक्रमात सहभागी झालेल्या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| दि.०९.०४.२०२२ शनिवार | पहाटे ५.४५ | उत्सवाचा प्रथम दिवस<br>श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक<br>वीणा- मा.श्री.अविनाश दंडवते, सदस्य<br>पोथी- मा.श्री. जयवंतराव जाधव, सदस्य<br>प्रतिमा- मा.अ‍ॅड. सुहास आहेर,सदस्य/मा.श्री.रराहूल कनाल,सदस्य |
| | पहाटे ६.०० | अध्याय वाचन –<br>अध्याय क्र.१- मा.श्री. सुरेश वाबळे, सदस्य<br>अध्याय क्र.२- मा.डॉ.एकनाथ गोंदकर, सदस्य<br>अध्याय क्र.३- मा.श्री. सचिन गुजर, सदस्य<br>अध्याय क्र.४- मा.श्री. महेंद्र शेळके, सदस्य<br>अध्याय क्र.५- मा.श्री. अविनाश दंडवते, सदस्य |

| | | |
|---|---|---|
| | सकाळी ७.०० <br> सायंकाळी ६.०० | श्रींची पाद्यपुजा- मा.ना.श्री.आशुतोष काळे,अध्यक्ष <br><br> मा.ॲड. सुहास आहेर, सदस्य |
| दि.१०.०४.२०२२ <br> रविवार | पहाटे ५.४५ | उत्सवाचा मुख्य दिवस <br> श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक <br> वीणा- मा.श्री. सुरेश वाबळे, सदस्य <br> पोथी- मा.श्रीमती अनुराधा आदिक, सदस्य <br> प्रतिमा- मा.श्री. महेंद्र शेळके, सदस्य/ मा.श्री. सचिन गुजर, सदस्य |
| | सकाळी ७.०० <br> सायंकाळी ६.०० | श्रींची पाद्यपुजा- मा.ॲड.जगदीश सावंत, उपाध्यक्ष <br><br> मा.श्री.अविनाश दंडवते, सदस्य |
| दि.११.०४.२०२२ <br> सोमवार | सकाळी ७.०० <br> सायंकाळी ६.०० | उत्सवाचा सांगता दिवस <br> श्रींची पाद्यपुजा- मा.श्रीमती अनुराधा आदिक, सदस्य <br><br> मा.श्री.जयवंतराव जाधव, सदस्य |
| | सकाळी ७.०० | गुरुस्थान येथे रुद्राभिषेक – मा.मुख्य कार्यकारी अधिकारी |

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२४** संस्थान अधिकारी/कर्मचारी यांना दैनंदिन कामकाजाचे दृष्टीने पायाभुत व कौशल्यपूर्ण प्रशिक्षण देणेकामी विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था, नाशिक या संस्थेमार्फत नाशिक येथे ०६ दिवसांचे निवासी प्रशिक्षण आयोजित करणेबाबत.

**निर्णय क्र.९१** यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान अधिकारी/कर्मचारी यांना दैनंदिन कामकाजाचे दृष्टीने पायाभुत व कौशल्यपूर्ण प्रशिक्षण देणेकामी विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था, नाशिक या संस्थेमार्फत नाशिक येथे ०६ दिवसांचे निवासी प्रशिक्षण आयोजित करणेकामी उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.११,५२,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. **(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२५** सन २००९ पासून प्रतिक्षासुचीवर असलेल्या पात्र अनुकंपा उमेदवारांना गट क व गट ड चे पदावर नेमणूका देणेबाबत.

**निर्णय क्र.९२** यावर सविस्तर चर्चा होऊन, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.२७.०८.२०२० चे शासन निर्णयास अधिन राहून सन-२००९ पासून प्रत्येक वर्षी रिक्त झालेल्या पदांच्या १० टक्के गट ‘क’ ची संख्या १२ पदे व गट ‘ड’ ची संख्या १६ पदे अशी एकूण २८ पदांवर सन-२००९ पासून प्रतिक्षासुचीवर असलेल्या पात्र अनुकंपा उमेदवारांना गट ‘क’ व गट ‘ड’ चे पदावर दोन वर्षाचे परिविक्षाधिन कालावधीवर सातव्या वेतन आयोगानुसार गट ‘क’ चे पदासाठी वेतन स्तराचे प्रारंभीक किमान वेतन रु.१९,९००/- व गट ‘ड’ चे पदासाठी वेतन स्तराचे प्रारंभीक किमान वेतन रु.१५,०००/- या एकत्रित मानधनावर नेमणूका देण्यास मान्यता देण्यात आली. तथापी याबाबत कायदेशीर बाबी तपासून पुढील कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले.

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

विषय नं.२६ सन २०२०-२१ कंत्राटी कर्मचारी यांचे पाल्यांचा शैक्षणिक शुल्क परतावा करणेबाबत.

निर्णय क्र.९३ यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाकरीता कंत्राटी कर्मचारी यांचे पाल्यांचा शैक्षणिक शुल्क परतावा करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.५०,००,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा, शासनाचे मान्यतेनंतर सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाकरीता कंत्राटी कर्मचा-यांचे पाल्यांचे शैक्षणिक फी परतावा विहीत पध्दतीने आदा करणेत यावा, असे ठरले. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.२७ संस्थानमधील कंत्राटी कर्मचा-यांना कर्मचारी राज्य विमा निगम (ESIC) योजना लागू करणेबाबत.

निर्णय क्र.९४ यावर सविस्तर चर्चा होऊन, कर्मचारी राज्य विमा महामंडळ, श्रम रोजगार मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील दि.२७ ऑक्टोंबर,२०२१ रोजीचे अधिसुचनेनुसार कर्मचारी राज्य विमा निगम (ESIC) योजना लागू करणे बंधनकारक असल्याने संस्थानमधील इनसोर्स कंत्राटी कर्मचारी व आऊटसोर्स ठेकेदाराकडील कंत्राटी कर्मचारी यांना कर्मचारी राज्य विमा निगम (ESIC) योजना लागू करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-कामगार विभाग)

---

विषय नं.२८ सन २०२२-२०२३ शैक्षणिक वर्षात शालेय व स्कुलबस शुल्कात १० टक्के फी वाढीबाबत.

निर्णय क्र.९५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल करीता सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाकरीता शालेय शुल्कात १० टक्के व स्कुलबस शुल्कात १० टक्के वाढ करण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

विषय नं.२९ शैक्षणिक वर्ष २०२१-२२ इयत्ता १ ली च्या वर्गासाठी शासनाचे बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ (RTE Act, 2009) अन्वये इयत्ता १ ली चे एकूण २२६ नवीन प्रवेशानुसार २५% प्रमाणे ५७ विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश देणेकामी मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.९६ यावर सविस्तर चर्चा होऊन, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ इयत्ता १ ली च्या वर्गासाठी शासनाचे बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ (RTE Act, 2009) अन्वये इयत्ता १ ली चे एकूण २२६ नवीन प्रवेशानुसार (एक विद्यार्थी शाळा सोडून गेलेला असल्याने) २५% प्रमाणे ५६ विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश देण्यास तसेच यापुर्वी आर.टी.ई. अंतर्गत २५% मोफत प्रवेश देण्यात आलेले प्रवेश पुढील वर्गात नियमीत करणेस, व २५%आर.टी.ई.अंतर्गत प्रवेश प्रक्रियेमध्ये प्रवेशीत झालेल्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक शुल्काची प्रतिपुर्ती शासनातर्फे निश्चित केलेल्या दरानुसार संस्थान खाती जमा करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- इंग्लिश मिडीयम स्कूल)

---

विषय नं.३० संस्थानचे शैक्षणिक संकुल हे नवीन शैक्षणिक संकुलात स्थलांतरीत करणेबाबत.

निर्णय क्र.९७ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, व श्री साईबाबा वरिष्ठ महाविद्यालय हे मौजे निमगांव-को-हाळे, ता.राहाता येथील संस्थान मालकीची जमीन गट नं.१८३/२ मधील नवीन शैक्षणिक संकुलाचे इमारतीमध्ये स्थलांतरीत करणेस व त्याकरीता उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्यानुसार कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय)

---

**विषय नं.३१** मे.व्ही.एम. डिस्ट्रीब्युटर्स, नाशिक यांचे कॅन्टीन विभागासाठी दुधाच्या पुरवठयाबाबत.

**निर्णय क्र.९८** यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.व्ही.एम.डिस्ट्रीब्युटर्स,नाशिक यांचे कॅन्टीन विभागासाठी दुधाच्या पुरवठयाबाबत उपरोक्त प्रस्तावात नमुद १ ते ५ नुसार कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

**विषय नं.३२** वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगाव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उभ्दव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर योजना तयार करणे व त्यास तांत्रिक मंजुरी देणेचे शुल्क रक्कम रुपये ३.९० कोटी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागास आदा करणेबाबत व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग व श्री साईबाबा संस्थान विश्‍वस्तव्यवस्था शिर्डी यांच्यात करावयाच्या करारनामा मसुदाबाबत.

**निर्णय क्र.९९** यावर सविस्तर चर्चा होऊन, वाढीव शिर्डी संस्थान पाणी पुरवठा योजनेतील टप्पा क्र.१ चे कामातील योजना तयार करावयाचे शुल्क तसेच तांत्रिक मान्यतेचे शुल्क असे एकुण १.५ टक्के शुल्क रक्कम रु.४२,७३,०३८/-मात्रमहाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना आदा करणे व सोबतच्या मसुद्याप्रमाणे करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात आली. तथापी याबाबत प्रथम महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय दि.०४.०६.२०१८ नुसार सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे व प्रकल्प व्यवस्थापन शुल्क म्हणून ३ टक्के इतके शुल्क आकारणेबाबत मा.अध्यक्ष महोदय व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मा.पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री महोदय यांचे दालनात मा.सदस्य सचिव, म.जि.प्रा.यांचे समवेत बैठक आयोजित करुन चर्चा करावी. असे ठरले.

(कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग)

---

**विषय नं.३३** वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगाव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उभ्दव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर टप्पा-१ चे कामातील पाईपलाईन मार्गातील रस्त्यांची दुरुस्ती खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.१००** यावर सविस्तर चर्चा होऊन, वाढीव शिर्डी संस्थान पाणी पुरवठा योजना टप्पा-१ चे कामातील पाईपलाईन मार्गातील रस्त्यांची दुरुस्ती संस्थानमार्फत करण्यास मान्यता देण्यात आली, तसेच याकामी मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी मागणी केलेली अनामत रक्कम त्यांचेकडे जमा करण्याची आवश्यकता नाही, तसे त्यांना कळविण्यात यावे, असे ठरले.

याकामी कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प विभाग, अहमदनगर यांनी कळविलेनुसार रस्ता दुरुस्ती करणे, पुर्न:स्थापन शुल्क रु.५,६३,७५०/- व सिक्युरीटी डिपॉझिट शुल्क रु.१,००,०००/-तसेच बॅंक गॅरंटी रक्कम रु.४०,२५०/- Executive Engineer, World Bank Project (P.W.) Division, Ahmednagar यांचे नावे जमा करणेस व याकामी मान्यतेसाठी प्रस्ताव मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर करणेस मान्यता देण्यात आली.

तसेच वाढीव शिर्डी संस्थान पाणी पुरवठा योजना टप्पा-१ चे कामातील पाईपलाईन मार्गातील रस्त्यांची दुरुस्तीकरीता येणा-या अंदाजे रक्कम रु.३,७०,९३,५२५/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे पाठविण्यात यावा, व शासनाचे मान्यतेनंतर विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, असे ठरले. (कार्यवाही- पाणी पुरवठा विभाग)

---

**विषय नं.३४** संस्थान परिसरात साईबाबा भक्तनिवासस्थानच्या पार्कींगमध्ये फळे विक्रीस परवानगी दिलेल्या फळे विक्रेत्यांना तत्सम ठिकाणी फळे विक्री करणेस मुदतवाढ देणेबाबत साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग यांचेकडील जा.क्रं.१३०० दि.०४/१०/२०२१ रोजीचे पत्र.

**निर्णय क्र.१०१** यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद अ.नं.१ ते ६ फळे विक्रेत्यांना त्यांचे विनंती अर्जानुसार दि.०१.११.२०२१ ते दि.३०.०९.२०२२ या ११ महिने कालावधीसाठी दरमहा रु.१००/-मात्र

भाडे आकारुन पुर्वीचेच अटी शर्तीवर श्री साईबाबा भक्तनिवासस्थानच्या पार्कींगमध्ये फळे विक्री करण्यास व श्री साईबाबा भक्तनिवासस्थान मार्फत करारनामा नोटराईज करुन घेण्यास मान्यता देण्यात आली. तसेच मयत फळ विक्रेते राऊसाहेब बाबुराव बनकर यांचा वारस मुलगा अर्जदार श्री. सुरज राऊसाहेब बनकर यांचा फळे विक्रीचा परवाना मिळणेची विनंती अमान्य करण्यात आली.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.३५** श्री साईबाबा हॉस्पिटलचे प्रांगणात रुग्णांचे नातेवाईकांचे सोईसाठी अल्पोपहार व झेरॉक्स व्यवस्था सुरु करणेस परवानगी मिळणेबाबत मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि. शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं.श्रीसासंएक्रेसो/७७/२०२१ दि.२८/०७/२०२१.

**निर्णय क्र.१०२** सदरचा प्रस्ताव नामंजूर करण्यात आला. (कार्यवाही- मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.३६** श्री.अभिजीत देविदास शिंदे, एम.डी.एस.रेसिडेन्सी, मु.पो.लोणी बु., ता.राहाता यांना ऐतिहासिक वस्तू, शस्त्रास्त्रे, कलादालन व प्रदर्शन मांडण्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालकीचे मौजे निमगाव-को-हाळे, ता.राहाता येथील वापरास दिलेल्या जागा वापराचे कोविड-१९ च्या प्रादुर्भावाचे संबंधात लॉकडाऊन-१ व लॉकडाऊन-२ चे कालावधीतील भाडे माफी मिळणेबाबतचा दि.१०/११/२०२१ व दि.३०/११/२०२१ रोजीचे अर्ज.

**निर्णय क्र.१०३** यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.अभिजीत देविदास शिंदे, एम.डी.एस.रेसिडेन्सी, मु.पो.लोणी बु., ता.राहाता यांना ऐतिहासिक वस्तू, शस्त्रास्त्रे, कलादालन व प्रदर्शनासाठी वापरास दिलेल्या संस्थान मालकीचे मौजे निमगाव-को-हाळे, ता.राहाता या जागेचे महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या लॉकडाऊन-१ व लॉकडाऊन-२ तसेच श्रींचे मंदिर दर्शनासाठी बंद असलेल्या कालावधीतील भाडे माफ करण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.३७** संस्थानचे दोन्हीही रुग्णालयात नर्सिंग स्टाफ, पॅरामेडीकल स्टाफ व इतर रिक्त जागांबाबत सद्यपरिस्थितीत कर्मचारी उपलब्धतेचा अहवाल.

**निर्णय क्र.१०४** यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय या दोन्हीही रुग्णालयात नर्सिंग स्टाफ, पॅरामेडीकल स्टाफ व इतर रिक्त जागांबाबत व सद्यपरिस्थितीत उपलब्ध कर्मचारी अहवालाचे अवलोकन करण्यात आले. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.३८** संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकिय बिलाचा परतावा रक्कम रु.६,५४,१४०/-आदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.

**निर्णय क्र.१०५** यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची वैद्यकीय देखभाल नियमावली सन-१९९९ अन्वये छाननी केली असून, त्यांची सत्यता पडताळून पाहिलेली असल्यामुळे, उपरोक्त प्रस्तावामधील १९ कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कम रु.६,५४,१४०/-मात्र त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.३९** संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकिय बिलाचा परतावा रक्कम रु.२५,२७,३३५/- आदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.

**निर्णय क्र.१०६** यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची वैद्यकीय देखभाल नियमावली सन-१९९९ अन्वये छाननी केली असून, त्यांची सत्यता पडताळून पाहिलेली असल्यामुळे, उपरोक्त प्रस्तावामधील १३ कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कम रु.२५,२७,३३५/-मात्र त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.४० संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकिय बिलाचा परतावा रक्कम रु.८,५२,७०७/- आदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.

निर्णय क्र.१०७ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची वैद्यकीय देखभाल नियमावली सन-१९९९ अन्वये छाननी केली असून, त्यांची सत्यता पडताळून पाहिलेली असल्यामुळे, उपरोक्त प्रस्तावामधील १६ कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कम रु.८,५२,७०७/- मात्र त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.४१ संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकिय बिलाचा परतावा रक्कम रु.११,२८,०६०/- आदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.

निर्णय क्र.१०८ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची वैद्यकीय देखभाल नियमावली सन-१९९९ अन्वये छाननी केली असून, त्यांची सत्यता पडताळून पाहिलेली असल्यामुळे, उपरोक्त प्रस्तावामधील १८ कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कम रु.११,२८,०६०/-मात्र त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.४२ संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकिय बिलाचा परतावा रक्कम रु.८,२१,९७१/- आदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.

निर्णय क्र.१०९ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची वैद्यकीय देखभाल नियमावली सन-१९९९ अन्वये छाननी केली असून, त्यांची सत्यता पडताळून पाहिलेली असल्यामुळे, उपरोक्त प्रस्तावामधील ११ कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कम रु.८,२१,९७१/-मात्र त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.४३ कायम कंत्राटी कर्मचा-यांच्या वैद्यकिय बिलाच्या परताव्याबाबत.

निर्णय क्र.११० सदरचा प्रस्ताव नामंजूर करण्यात आला. (कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.४४ संस्थानमार्फत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांच्या वैद्यकिय बीलाच्या परताव्याबाबत.

निर्णय क्र.१११ सदरचा प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात आला. (कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.४५ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये डिसेंबर-२०२१ महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.५०,४८,९६२/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.११२ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये डिसेंबर-२०२१ या महिन्यात वैद्यकीय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहीत पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम रु.५०,४८,९६२/-मात्रचे अवलोकन करुन त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.४६ श्री साईबाबा हॉस्पिटलमधील जिवनदायी आरोग्य योजना विभागाचे विशेष लेखापरिक्षण अहवालाबाबत.

निर्णय क्र.११३ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरचा प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात आला. सविस्तर माहितीसह प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर ठेवण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.४७ मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयास अनुसरुन श्री साईनाथ रुग्णालयात माहे एप्रिल-२०२१ ते सप्टेंबर-२०२१ अखेर वैद्यकीय उपचार व औषधांसाठी झालेल्या रक्कम रु.३,६३,४०,६४३/- च्या खर्चाची नोंद घेऊन त्यास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.११४ यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयास अनुसरुन श्री साईनाथ रुग्णालयात माहे एप्रिल-२०२१ ते सप्टेंबर-२०२१ अखेर वैद्यकीय उपचार व औषधांसाठी झालेल्या रक्कम रु.३,६३,४०,६४३/-मात्रच्या खर्चाचे अवलोकन करुन त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)

---

विषय नं.४८ दर्शनलाईन व मंदिर परिसरात पुर्वी साईभक्तांना पिण्याचे पाणी वाटपाचे काम करीत असलेल्या ३२ आऊटसोर्स कंत्राटी कर्मचारी यांना पुन:श्च कामावर सामावून घेणेबाबत.

निर्णय क्र.११५ यावर सविस्तर चर्चा होऊन, दर्शनलाईन व मंदिर परिसरात पुर्वी साईभक्तांना पिण्याचे पाणी वाटपाचे काम करीत असलेल्या आऊटसोर्स कंत्राटी कर्मचा-यांपैकी ज्या कर्मचा-यांना कामाची नितांत आवश्यकता आहे अशा गरजु कर्मचा-यांना आऊटसोर्स ठेकेदारामार्फत पुन:श्च कामावर घेण्यास व त्याकरीता उपरोक्त प्रस्तावात नमुद 'ब' प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली. तत्पुर्वी कामावर घेण्यात येणा-या गरजु आऊटसोर्स कंत्राटी कर्मचा-यांची यादी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावी, असे ठरले.

(कार्यवाही-श्री साईप्रसाद निवासस्थान)

---

विषय नं.४९ संस्थानला कुशल अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या ठेकेदारामार्फत कार्यरत परिचारिका व पॅरामेडीकल स्टॉफ यांचे समान काम समान वेतनाबाबत मागणी व बेमुदत काम बंद आंदोलन (१२ ते जागतिक परिचर्या) चे अर्जाबाबत.

निर्णय क्र.११६ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला कुशल अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या ठेकेदारामार्फत कार्यरत परिचारिका व पॅरामेडीकल स्टॉफ यांची अत्यावश्यक सेवा विचारात घेऊन त्यांना प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे राष्ट्रीय मिशन अंतर्गत कार्यरत पॅरामेडीकल स्टॉफ प्रमाणे रु.२०,०००/-मासिक वेतन+कुशल कामगारांचे दर सहा महिन्याने वाढणारा विशेष भत्ता असे एकूण वेतनावर २० टक्के वाढ याप्रमाणे वेतन देण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.५० सन २०१९-२०२० मध्ये दर्शन रांगेत मोफत वाटप करण्यात आलेल्या चहा, कॉफी, दुध व बिस्कीटे वाटपाकामी झालेल्या खर्चाची नोंद घेणेबाबत.

निर्णय क्र.११७ यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे एप्रिल-२०१९ ते मार्च-२०२० या कालावधीत शांतिनिवास/ भक्तनिवास दर्शनरांगेमध्ये साईभक्तांना मोफत वाटप करण्यात आलेल्या चहा, कॉफी, दुध व बिस्कीटे वाटपाकामी झालेल्या खर्चाची रक्कम रु.७४,२६,६७२/-मात्रचे अवलोकन करुन त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-कॅन्टीन विभाग)

---

विषय नं.५१ शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांच्या दैनंदिन स्वच्छता विषयक कामांचा सहामाई परिक्षण अहवाल नोंद घेणेकामी सादर करणेबाबत.

निर्णय क्र.११८ यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांच्या दैनंदिन स्वच्छता विषयक कामांचा सहामाई परिक्षण अहवालाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-आरोग्य विभाग)

---

**विषय नं.५२** **श्री.विजय तुकाराम मोकळ, सेवा निलंबीत सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे दि.०६.१२.२०२१ रोजीचे खाते चौकशी निष्कर्ष अहवालाबाबत.**

**निर्णय क्र.११९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.विजय तुकाराम मोकळ, सेवा निलंबीत सफाई कामगार, आरोग्य विभाग यांना किरकोळ दंडात्मक कारवाया अंतर्गत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम-२०१३ प्रकरण ३ कलम ५(४) अन्वये त्यांची एक वार्षिक वेतनवाढ कायमस्वरुपी रोखण्याची शिक्षा देण्यात येऊन श्री.मोकळ यांना कामावर हजर/रुजू करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.५३** **श्री.अरुण गणपतराव जाधव, वायरमन, विद्युत विभाग, सध्या पाणीपुरवठा विभाग यांनी मा.अध्यक्ष महोदय, तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे दिनांक १५.०७.२०२१ रोजीचे अपील अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.१२०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.अरुण गणपतराव जाधव, वायरमन, विद्युत विभाग, सध्या पाणीपुरवठा विभाग यांनी मा.अध्यक्ष महोदय यांचेकडे केलेला दि.१५.०७.२०२१ रोजीचा अपिल अर्ज फेटाळण्यात आला.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.५४** **श्री. भाऊसाहेब एकनाथ अनाप, सहा.शिक्षक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, यांना गैरशिस्त वर्तनाबाबत ठेवण्यात आलेला ठपका रद्द करणेकरीता मा.अध्यक्ष, व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडेस केलेल्या दि.१५/०६/२०२० रोजीचे अपिल अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.१२१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. भाऊसाहेब एकनाथ अनाप, सहा.शिक्षक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, यांना गैरशिस्त वर्तनाबाबत ठेवण्यात आलेला ठपका रद्द करणेकरीता श्री.अनाप यांनी मा.अध्यक्ष महोदय यांचेकडे केलेला दि.१५/०६/२०२० रोजीचा अपिल अर्ज फेटाळण्यात आला.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.५५** **श्री.किशोर साहेबराव गवळी, प्र.सीसीटीव्ही कंट्रोल सेल प्रमुख, सीसीटीव्ही कंट्रोल सेल विभाग यांचे खाते चौकशी दि.०७.०५.२०२१ रोजीचे अपील अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.१२२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.किशोर साहेबराव गवळी, प्र.सीसीटीव्ही कंट्रोल सेल प्रमुख, सीसीटीव्ही कंट्रोल सेल विभाग यांनी खाते चौकशी रद्द होणेबाबत मा.अध्यक्ष महोदय यांचेकडे केलेला दि.०७/०५/२०२१ रोजीचा अपिल अर्ज फेटाळण्यात आला.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.५६** **श्री.विकास महादेव शिवगजे, सहा.शिक्षक, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांचे दि.०१.१२.२०२० रोजीचे अपील अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.१२३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.विकास महादेव शिवगजे, सहा.शिक्षक, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांनी मा.अध्यक्ष महोदय यांचेकडे केलेला दि.०१/१२/२०२० रोजीचा अपिल अर्ज फेटाळण्यात आला.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

विषय नं.५७ श्री.विठ्ठल तुकाराम पवार, वर्ग-०४ कर्मचारी, श्री साई आश्रम भक्तनिवास सध्या आरोग्य विभाग यांचे दि.१५.०६.२०२१ रोजीचे अपील अर्जाबाबत.

निर्णय क्र.१२४ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.विठ्ठल तुकाराम पवार, वर्ग-०४ कर्मचारी, श्री साई आश्रम भक्तनिवास सध्या आरोग्य विभाग यांनी मा.अध्यक्ष महोदय यांचेकडे केलेला दि.१५/०६/२०२१ रोजीचा अपिल अर्ज फेटाळण्यात आला. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.५८ श्री.विठ्ठल तुकाराम पवार, वर्ग-०४ कर्मचारी, श्री साईबाबा भक्तनिवास सध्या आरोग्य विभाग यांचे दिनांक २०.०७.२०२१ रोजीचे अपील अर्जाबाबत.

निर्णय क्र.१२५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.विठ्ठल तुकाराम पवार, वर्ग-०४ कर्मचारी, श्री साई आश्रम भक्तनिवास सध्या आरोग्य विभाग यांनी मा.अध्यक्ष महोदय यांचेकडे केलेला दि.२०/०७/२०२१ रोजीचा अपिल अर्ज फेटाळण्यात आला.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यात आली.

आयत्या वेळेचा
विषय नं.०१ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील आवश्यक वैद्यकिय अधिकारी रिक्त पदे जाहिरातीव्दारे तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी भरणेबाबत.

निर्णय क्र.१२६ सदरचा विषय रद्द करुन नवीन सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे ठेवण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०२ शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये ज्युनियर केजी वर्गासाठी ऑनलाईन पध्दतीने नविन प्रवेश प्रक्रिया राबविणेस व मर्यादीत एकूण २५० प्रवेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.१२७ यावर सविस्तर चर्चा होऊन, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये ज्युनियर के.जी.च्या ५ वर्ग तुकडीसाठी प्रत्येकी ५० विद्यार्थी संख्येप्रमाणे प्रस्तावीत केलेल्या नियम व अटी शर्तीस अधिन राहून मागील वर्षीप्रमाणे ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबवून मर्यादीत एकूण २५० नविन प्रवेश देण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०३ श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल कडील RTE 25% प्रतिपुर्ती करीता , संस्थानच्या नावाने पंजाब नॅशनल बँक, शिर्डी येथे स्वतंत्र बचत खाते उघडणेबाबत.

निर्णय क्र.१२८ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल यांचे मागणीनुसार तसेच शिक्षण विभाग यांचे पत्रान्वये श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल यांचेकडील आरटीई अंतर्गत २५ टक्के प्रतिपुर्ती करीता तातडीची गरज असल्याने पंजाब नॅशनल बँक, शिर्डी येथे संस्थानच्या नावाने नव्याने स्वतंत्र बचत खाते उघडण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-लेखाशाखा)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४ श्री साईबाबा महाविद्यालय–शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता विज्ञान प्रयोगशाळा साहीत्य खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.१२९ यावर सविस्तर चर्चा होऊन, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता श्री साईबाबा महाविद्यालयाचे रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र व इलेक्ट्रॉनिक्स प्रयोगशाळेसाठी आवश्यक साधने, रसायने, काचेच्या वस्तु इत्यादी साहीत्य खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.६,८६,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा महाविद्यालय)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५ लेंडीबागेतील श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे कापडी ध्वज बदलून पंचधातूचा ध्वज कायमस्वरुपी स्तंभावर लावणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१३० यावर सविस्तर चर्चा होऊन, लेंडीबागेतील ध्वजस्तंभावर पंचधातूचा ध्वज लावण्याचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला. लेंडीबागेतील ध्वजस्तंभावर पुर्वीप्रमाणे कापडीध्वज लावणेत यावा व प्रत्येक उत्सवाचे वेळी तो बदलण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही- मंदिर विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६ संगणक दुरुस्ती देखभाली अंतर्गत संगणकीय व अनुषंगीक साहीत्य आवश्यकतेप्रमाणे वेळोवेळी खरेदी करणेसाठी वार्षिक दरकरार निश्चित करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेबाबत.**

**निर्णय क्र.१३१ यावर सविस्तर चर्चा होऊन, संगणक दुरुस्ती देखभालीचे कामकाज वेळेत पुर्ण होणेच्या दृष्टीने सन-२०२२ या वर्षाकरीता संगणकीय साहीत्य खरेदी करणेकामी प्रचलित पध्दतीने खरेदी प्रक्रिया राबवून पात्र पुरवठाधारकांना दरकरार निश्चित करणेकामी कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७ किराणामाल व वनस्पती तूप खरेदीकामीचे फेर ई-निविदेचे प्राप्त नमुने निवडणेबाबत.**

**निर्णय क्र.१३२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेल्या अ.नं.१ ते ११ किराणामाल व वनस्पती तूप खरेदीकामीचे नमुने निवडणेकामी सर्व समिती सदस्य यांना निमंत्रीत करण्यात यावे. उपस्थित असलेले मा.सदस्य, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी व महात्मा फुले कृषी विद्यापीठातील तज्ञ यांचे उपस्थितीत सदरचे काम करण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**मा.विश्वस्तांनी आयत्या वेळी घेतलेले ठराव**

**आयत्या वेळेचा विषय नं.०८**

**ठराव क्र.१३३ भारतरत्न गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांचे नुकतेच दु:खद निधन झाले आहे. त्यांनी गायलेल्या श्री साईबाबांच्या आरत्या कॅसेटचे स्वरुपात संस्थानमार्फत प्रकाशीत केलेल्या आहेत. सदरच्या आरत्या आधुनिक पध्दतीने (Pen drive) पुन:प्रकाशित करण्यात याव्यात. (कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.०९**

**ठराव क्र.१३४ श्री साईबाबांचे उत्सव कालावधीत विविध ठिकाणाहून येणा-या साईभक्तांच्या पालख्या पुर्ववत सुरु करण्यात याव्यात. (कार्यवाही- जनसंपर्क विभाग)**

---

आयत्या वेळेचा विषय नं.१०

ठराव क्र.१३५ श्रींचे पुण्यतिथी उत्सवातील आराधना विधी मा.अध्यक्ष महोदय यांचे हस्ते करण्यात यावा.

(कार्यवाही- मंदिर विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.११

ठराव क्र.१३६ संस्थानचे विविध विकास प्रकल्प तसेच प्रलंबीत प्रकल्प यांना प्राधान्य देण्यात यावे. सदरचे प्रकल्प पुर्ण करणेसाठी कार्यवाही सुरु करण्यात यावी. याकरीता शासनाचे मंजूरीची/परवानगीची आवश्यकता असल्यास संबधीत खात्याचे मा.मंत्री महोदय यांचेशी बैठक आयोजित करणेबाबत कार्यवाही करण्यात यावी. यानुसार संस्थानचे लेखाशाखेत देणगी दाखल जमा असलेल्या जुन्या नोटांबाबतही कार्यवाही करण्यात यावी.

(कार्यवाही-लेखाशाखा/बांधकाम विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.१२

ठराव क्र.१३७ संस्थानचे शैक्षणिक संकुलामध्ये सुरु असलेल्या इंग्लिश मिडीयम स्कुल, कन्या विद्या मंदिर, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था यामध्ये शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांकरीता शैक्षणिक उपक्रमासोबत श्री साईबाबांची शिकवण व तत्वे यांचा समावेश करण्यात यावा, श्री साई चरित्रावर आधारीत विविध स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात. जेणे करुन संस्थानचे शैक्षणिक संकुलात शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार होतील व देशाला आदर्श साईभक्त नागरिक मिळतील. तसेच प्रायोगिक तत्वावर आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धांना मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-शैक्षणिक संकुल)

---

आयत्या वेळेचा विषय नं.१३

ठराव क्र.१३८ संस्थान कर्मचा-यांची गैरशिस्त वर्तनाबाबत सुरु असलेली खाते चौकशी तीन महिन्याचे आत पुर्ण करण्यात यावी. याबाबत खाते चौकशी अधिकारी यांना सुचना देण्यात याव्यात. आवश्यकता असल्यास नवीन खाते चौकशी अधिकारी यांची नियुक्ती करण्यात यावी.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.१४

ठराव क्र.१३९ संस्थानमधील कायम कर्मचा-यांना गणवेश देणेकामी तत्कालीन मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.०६.०८.२०२१ रोजीचे सभेतील निर्णय क्र.११६ नुसार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे अधिकारात कार्यवाही करावी.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.१५

ठराव क्र.१४० श्री साईबाबा हॉस्पिटल येथील दंत विभाग श्री साईनाथ रुग्णालय येथे सुरु करणेबाबचा प्रस्ताव सादर करण्यात यावा. (कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

आयत्या वेळेचा विषय नं.१६

ठराव क्र.१४१ संस्थानचे देणगी काऊंटर अद्ययावत असावे, त्याठिकाणी देणगीदार साईभक्तांना झेरॉक्स काढण्याची सुविधा, देणगी देतेवेळीचा फोटो घेण्यासाठी सेल्फी पॉईंट, बसण्यासाठी सुविधा, पिण्याचे पाणी, चहा इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. संस्थान मार्फत चालविणे जाणारे विविध उपक्रम जसे रुग्णालये, प्रसादालय, शैक्षणिक संकुल इत्यादीची माहिती साईभक्तांना मिळावी याकरीता Display बसविण्यात यावा. देणगीदार साईभक्तांची दर्शन/आरतीची व्यवस्था करण्यासाठी देणगी काऊंटर व जनसंपर्क कार्यालय यांचेमध्ये समन्वय ठेवण्यात यावा.

(कार्यवाही-लेखाशाखा/ जनसंपर्क विभाग/बांधकाम विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.१७

ठराव क्र.१४२ श्री सिध्दी विनायक गणपती मंदिर ट्रस्ट कडून भक्तांना देण्यात येणारा लाडू प्रसाद ज्या पॅकिंगमध्ये देण्यात येतो त्यानुसार पॅकिंगमध्ये साईभक्तांना लाडू प्रसाद देणेबाबत कार्यवाही करण्यात यावी. प्रत्येक शनिवार/रविवार तसेच गर्दीचे काळात संबधीत विभागप्रमुख यांनी सर्व लाडू प्रसाद विक्री काऊंटरला भेट द्यावी. आवश्यकतेनुसार लाडू प्रसाद विक्री करणेबाबत संबधीत कर्मचारी यांना सुचना दयाव्यात. (कार्यवाही-लाडू प्रसाद निर्मिती विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.१८

ठराव क्र.१४३ श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमित्त संस्थानचे तत्कालीन व्यवस्थापन समितीने श्री साईनाथ रुग्णालय व श्री साई प्रसादालय निशुल्क करणेबाबत निर्णय घेतलेला असून त्यानुसार आजतायागत कार्यवाही सुरु आहे. तथापी कोव्हीड-१९चे कालावधीतील संस्थानचे उत्पन्नाचा विचार करता सदरचा निर्णय कायमस्वरुपी सुरु ठेवणे व्यवहार्य दिसून येत नाही. याकरीता संस्थानचे उत्पन्न वाढविण्यासाठी श्री साईनाथ रुग्णालयातील वैद्यकीय सुविधा, श्री साई प्रसादालयातील प्रसाद भोजन सशुल्क करणे तसेच संस्थानचे सर्व भक्तनिवासस्थानचे शुल्क वाढविणे व नाष्टापाकीटे विक्रीसाठी रेल्वे स्टेशन, बस स्टॅन्ड येथे काऊंटर सुरु करणे याबाबतचे सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती समोर सादर करण्यात यावेत. (कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय/ श्री साई प्रसादालय/सर्व निवासस्थाने)

---

आयत्या वेळेचा विषय नं.१९

ठराव क्र.१४४ संस्थानचे कायम कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांना प्रासंगिक प्रसंगी पुढील उपचारासाठी बाहेरील इतर हॉस्पिटलमध्ये पाठविले जाते. त्यामुळे उपचाराची रक्कम कर्मचा-यांना संस्थानमार्फत रोख स्वरुपात आदा केली जाते. याकरीता संस्थानचे कायम कर्मचा-यांचा मेडीक्लेम विमा उतरविल्यास कर्मचारी या योजनेव्दारे सर्व प्रकारचे वैद्यकीय उपचार घेऊ शकतील व त्यामुळे संस्थानला कर्मचा-यांना वैद्यकीय बिलाचा परतावा रोख स्वरुपात आदा करण्याची आवश्यकता भासणार नाही. याकरीता संस्थानचे कायम कर्मचा-यांचा मेडीक्लेम विमा उतरविणेकामी फक्त कर्मचा-याचा विमा उतरविणेकामी येणारा संपुर्ण खर्च संस्थानने करावा व कर्मचा-यावर अवलंबीत असणा-यांसाठी विमा उतरविणेकामी येणारा ५०% खर्च संस्थानने व ५०% खर्च संबधीत कर्मचारी यांनी करावा अशा स्वरुपाचा सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा.

(कार्यवाही- लेखाशाखा विभाग/ श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

आयत्या वेळेचा विषय नं.२०

ठराव क्र.१४५ संस्थानचे मंदिर परिसरामध्ये सुरु असलेले अगरबत्ती विक्री स्टॉल पैकी करारनाम्यामध्ये नमुद केल्यानुसार दोन स्टॉल ठेवून बाकीचे स्टॉल काढून घेणेबाबत कार्यवाही करण्यात यावी.

(कार्यवाही-बगीचा विभाग/मालमत्ता विभाग/संरक्षण विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.२१

ठराव क्र.१४६ संस्थानमार्फत श्री साईबाबा वरिष्ठ महाविद्यालय सन-२०१८ पासून सुरु करण्यात आलेले असुन या वरिष्ठ महाविद्यालयात कला, वाणिज्य व विज्ञान या तीनही शाखांचा समावेश आहे. सध्या वरिष्ठ महाविद्यालयात तीनही शाखा मिळून ७७९ विद्यार्थिनी व विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आकृतीबंधानुसार वरिष्ठ महाविद्यालयाकरीता प्राचार्य पद मंजुर आहे. तथापी सदरचे पद सध्या रिक्त असुन प्राचार्य पदावर PhD व NET SET उत्तीर्ण उमेदवाराची नियुक्ती करण्यात यावी. प्राचार्य पदावर नेमणूक होई पर्यंत सद्यस्थितीत सप्टेंबर-२०२१ मध्ये मुलाखतीव्दारे वरिष्ठ महाविद्यालयाकरीता कंत्राटी तत्वावर घेतलेल्या ३० प्राध्यापकांपैकी PhD व NET SET शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांची प्रभारी प्राचार्य म्हणून नेमणूक करणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात यावा.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.२२

ठराव क्र.१४७ कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे बहुतेक कुटूंबातील कर्ता पुरुष/ आई मयत झाले असून अशा कुटूंबातील निराधार मुले व मुली यांच्या पुढील शिक्षणाची व संगोपनाची जबाबदारी काही सामाजिक संस्थानी घेतली आहे. याच धर्तीवर अहमदनगर जिल्हयातील कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे मयत झालेल्या कुटूंबातील मुलांची संस्थानचे शैक्षणिक संकुलामध्ये मोफत शिक्षण, जेवण व राहण्याची सुविधा करणेबाबत तसेच संस्थानमार्फत सामुदायिक विवाह सोहळा या सारखे सामाजिक उपक्रम राबविणेबाबत पडताळणी करुन प्रस्ताव सादर करण्यात यावा.

(कार्यवाही-शैक्षणिक संकुल/जनसंपर्क कार्यालय)

---

आयत्या वेळेचा विषय नं.२३

ठराव क्र.१४८ संस्थानचे मंदिर परिसरामध्ये ठिकठिकाणी लावण्यात आलेले बॅरीगेटस् पैकी आवश्यक त्या ठिकाणचे बॅरीगेटस् ठेवून उर्वरीत ठिकाणचे बॅरिगेटस् काढून घेणेबाबत कार्यवाही करण्यात यावी.

(कार्यवाही-संरक्षण विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.२४

ठराव क्र.१४९ साई सभागृहाजवळील दोन व्हि.आय.पी.हॉल पैकी एका हॉलचा वापर पारायण हॉल म्हणून करण्यात यावा.

(कार्यवाही-मंदिर विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.२५

ठराव क्र.१५० श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने घेण्यात येणा-या परिचारक/परिचारीका यांना मुदत संपल्यानंतर ४ दिवस ब्रेक देऊन पुन्हा तात्पुरती नियुक्ती देण्यात येते. तथापी ४ दिवसाचा ब्रेक हा कायदेशिररित्या ग्राहय नाही. याबाबत कायदेशीर सल्ला घेण्यात यावा.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ मधील कलम १३(४) नुसार संस्थानचा आकृतीबंध मंजूर करण्यात आलेला असून आकृतीबंधातील अटी शर्ती क्र.८ मध्ये 'समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी जेणे करुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही' असे नमुद केले आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने घेण्यात येणा-या परिचारक/परिचारीका यांचा दोन ११ महिन्यातील नेमणूकामधील कालावधी सलग होऊ नये याकरीता ४ दिवस ब्रेक देऊन पुन्हा तात्पुरती नियुक्ती देण्यात येते.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

आयत्या वेळेचा विषय नं.२६

ठराव क्र.१५१ गेट नं.०४ चे समोर त्रिकोणाचे जागेत शिर्डी नगरपंचायतकडून श्री साईबाबांचा भव्य पुतळा उभारण्याची कार्यवाही सुरु आहे. ती थांबविणे आवश्यक आहे, याकरीता मा.अध्यक्ष महोदय, मा.उपाध्यक्ष महोदय व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शिर्डी नगरपंचायतीचे पदाधिकारी यांचेशी चर्चा करावी.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.२७

ठराव क्र.१५२ संस्थानचे विविध विभागात कार्यरत असलेले कंत्राटी कर्मचा-यांपैकी ज्या कंत्राटी कर्मचा-यांची हजेरी ८० टक्के पेक्षा कमी आहे अशा कंत्राटी कर्मचा-यांची सविस्तर माहिती मा.व्यवस्थापन समितीचे पुढील सभेसमोर सादर करण्यात यावी.

(कार्यवाही-कामगार विभाग)

---

**आयत्या वेळेचा विषय नं.२८**

**ठराव क्र.१५३** **संस्थान मालकीच्या बंद स्थितीत असलेल्या मौजे शिर्डी येथील 'सेवाधाम' इमारत व मौजे निघोज येथील दानपत्राव्दारे मिळालेली 'पालखी निवारा' इमारत साई भक्तांच्या निवासासाठी सुरु करणेबाबत कार्यवाही करणेत यावी.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग/साई प्रसाद निवासस्थान)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.२९**

**ठराव क्र.१५४** **तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६.०७.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४८६ अन्वये संस्थानमध्ये नर्सिंग कॉलेज सुरु करणेस व त्याकरीता येणा-या अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार संस्थानमध्ये नर्सिंग कॉलेज सुरु करणेस मान्यतेसाठीचा प्रस्ताव मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे दि.३०.०८.२०१८ रोजी पाठविण्यात आलेला असुन त्या अनुषंगाने मा.शासनाने मागणी केलेली माहिती/कागदपत्रे इकडील दि.०७.१.२०२२ रोजीचे पत्रान्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना पाठविण्यात आलेली आहे. याबाबत पाठपुरावा करण्यात यावा.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.३०**

**ठराव क्र.१५५** **संस्थानचे सर्व भक्तनिवासस्थानमधील बेडशीट, चादरी, गादी इत्यादी बाबतचा सद्यस्थिती अहवाल मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात यावा.** **(कार्यवाही-सर्व निवासस्थाने)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.३१**

**ठराव क्र.१५६** **ग्रीन एन क्लिन शिर्डी फाऊंडेशन, शिर्डी या संस्थेचे अध्यक्ष, कार्याध्यक्ष व इतर पदाधिकारी आजचे सभेसमोर उपस्थित होते. त्यांनी संस्थेमार्फत राबविण्यात येणा-या स्वच्छता, वृक्षारोपन, पर्यावरण संवर्धन इत्यादी उपक्रमाची माहिती सभेस दिली. तसेच मागील दोन वर्षापासून शिर्डीत 'शिर्डी परिक्रमा उत्सव' सुरु केला आहे. दि.१३ मार्च, २०२२ रोजी शिर्डी परिक्रमेचे आयोजन केले आहे. त्याकरीता संस्थानकडून मदत होणेबाबत विनंती केली आहे.**

**संस्थानचे तसेच मंदिराचे दैनंदिन कामकाजात कुठलीही अडचण/अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घेऊन ग्रीन एन क्लिन शिर्डी फाऊंडेशन, शिर्डी यांना संस्थानकडून शक्य असेल ती मदत या वर्षाकरीता देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-जनसंपर्क विभाग)**

---

**वरील निर्णय/ठराव क्र.६८ ते १५६ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर रात्रौ.०९.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| (भाग्यश्री बानायत,भा.प्र.से.) | (ना.आशुतोष अशोकराव काळे) |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**